## प्रकरण पाचवे

# दादासाहेब शिर्के एक लेखक

## प्रकरण पाचवे

### ` दादासाहेब शिर्के एक लेखक `

श्री.दा.म.शिर्के पत्रकारच नव्हे तर त्यांनी पुस्तक रुपाने सुध्दा लिखाण केले आहे. श्री दादासाहेब शिर्के यांनी ३१ मे १९३४ रोजी `कोल्हापूरचा राज्यकारभार` हे पहिले पुस्तक लिहिले. त्यानंतर `इंग्रजीसत्ता व दलित जनता` हे पुस्तक सन १९३५ मध्ये तर `करवीर सरकारचे दलितोध्दाराचे कानू` हे सन १९३६ मध्ये लिहिले[१] या पुस्तकांच्यामध्ये श्री दादासाहेब शिर्के यांनी वेगवेगळ्या विषयावर प्रकाश टाकला आहे.

श्री दादासाहेब शिर्के यांनी `कोल्हापूरचा राज्यकारभार` हे पहिले पुस्तक श्रीमान्मातु श्री आईसाहेब महाराज यांना अर्पण केले आहे. ते आपल्या या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये म्हणतात कोल्हापूरचा राज्यकारभार म्हणजे छत्रपती सर श्रीराजाराम महाराजांची प्रगमनशील कारकिर्द. या कारकीर्दीचा इतिहास ग्रंथीत करताना कोल्हापूर संस्थानसंबंधी प्राचीन व अर्वाचीन अशी विशिष्ट स्वरुपाची माहिती देणे अगत्याचे असल्यामुळे या चिमुकल्या पुस्तकात ती दिग्दर्शीत केलेली आहे. कोल्हापूर संबंधी सर्वप्रकारची माहिती पुरविणारे असे हे पहिलेच पुस्तक आहे. या पुस्तकाची आधारभूत साधने म्हणजे सरकारी खात्यामार्फत मिळालेली माहिती,सरकारी ग्याझिट,वृत्तपत्रीय हकीगत,कोल्हापूरसंबंधी छोटी मोठी पुस्तके आणि इतर सद्गृहस्थाकडून मिळविलेला वृत्तसार ही होत.[२]

श्री.दा.म.शिर्के यांनी `कोल्हापूरचा राज्यकारभार` या पुस्तकामध्ये एकूण १७ प्रकरणे लिहिली आहेत ते `तक्तारुढ राजवंश` या पहिल्या प्रकरणात धर्मवीर संभाजी महाराज यांचा मोगलाकडून अमानुषपणे खून झाला आणि

त्याचा पुत्र शाहू यास पकडून नेले पुढे द्वितीय शिवकुमार श्री राजाराम छत्रपती यांनी राज्यसुत्रे हाती घेतल्यानंतर सन १७०० साली त्याचा अंत झाल्याने त्याची पत्नी ताराबाई हिने मोठया धैर्याने पुढे येऊन आपला अल्पवयी पुत्र शिवाजी यास गादीवर बसविले व राज्यकारभार सुरु केला. त्यानंतर औरंगजेब बादशहाचा मृत्यू १७०७ मध्ये झाल्यानंतर त्याचा पुत्र आझमशहा यांने मराठयांच्यात फुट पाडण्यासाठी बंदीवासातून शाहूची सुटका केली.ताराबाई आणि शाहू यांच्यात संघर्षाला सुरुवात झाली.शेवटी त्याचा परिणाम असा झाला की मराठा राज्याची कोल्हापूर व सातारा अशा दोन गाधा निर्माण झाल्या.

याच्यापुढे जाऊन दा.म.शिर्के छत्रपती राजाराम महाराज यांच्या जन्मापासून युरोपमधील विद्याभ्यास ते परत मायदेशी इथं पर्यन्तचा वृत्तात देतात.[3]

' कोल्हापूरचे महत्व परिक्षण ' या तिसच्या प्रकरणामध्ये ते कोल्हापूरचे ऐतिहासिक महत्व सांगतात. की कोल्हापूर प्रांतावर निरनिराळ्या वंशजांनी राज्यकारभार चालविलेला आहे. मौर्य आंध्र,चालूक्य,राष्ट्रकूट,शिलाहार,यादव, बहामनी इ.हिंदु लोक कोल्हापूरला ' दक्षिण काशी ' म्हणतात.[४]

त्याच बरोबर ते पुढे म्हणतात कोल्हापूर प्रांतात कोरीव लेणी पहाण्यासारखे आहे. पावनगडाजवळ मसाइचे म्हणून जे पठार आहे त्याच्या नजिकच पांडवदरा या नावाने सर्वांच्या माहितीचे असलेले एक पूर्वकालीन लेणी आहे. दुसरे लेणी वाडी रत्नागिरी (जोतीबाचा डोंगर ) येथे आहे.डोंगराच्या आग्नेय दिशेच्या कपारीला पवाळ्याचे कोरीव लेणी म्हणून त्याची प्रसिध्द आहे.[५]

' लोकहिताचे कानूकायदे ' या प्रकरण पाच मध्ये राजर्षि शाहू महाराजांनी अनिष्ठ चालीविरुध्द कायदे पास केले होते.त्या कायद्याविषयी माहिती श्री.दा.म.शिर्के आपल्या पुस्तकात देतात ,धार्मिक रुढीच्या नावांखाली देवादिकांना जोगी व जोगिणी वहाण्याच्या पवित्र प्राचीन पध्दतीचे रुप

पालटून जाऊन त्याला हिडीस स्वरुप आले होते. भ्रष्टाचार वाढला होता. आणि धर्माच्या नावाखाली अमानुष कृत्ये घडत होती.यावर उपाय योजना म्हणून २०व्या शतकाच्या सुरुवातीस ' जोगत्या मुरळ्या प्रतिबंधक कायदा' कोल्हापूरात पास झाला[६], त्या योगाने प्रजा जनाना धर्मनीतीचा नवा धडा मिळाला.हा कायदा उल्लंघन करणाऱ्या लोकांसाठी कायद्याने जबर शिक्षा सांगितलेली आहे. यामुळे लोक आपोआपच अशा अनिष्ठ चालीपासून हळूहळू परावृत्त होऊ लागले. धर्माच्या नावाखाली अमंगल होणाऱ्या पावित्र्यास अशा कायद्याने चांगलाच पायबंद लागला.

करवीर सरकारनी सन १९१७ साली सक्तीच्या मोफत शिक्षणाबाबतचा कायदा जाहीर केला. राजर्षि शाहू महाराजांनी आपल्या अज्ञप्रजेला सक्तीच्या मोफत शिक्षणाची सोय केली.शिक्षणास योग्य वयाची मुले म्हणजे वयाच्या ७व्या वर्षापासून पूर्ण १४ वर्षे ( पुढे १९१९ मध्ये १२ वर्षे ठरली ) होईपयन्तची समजण्यात यावीत.सक्तीच्या शिक्षणास योग्य असणाऱ्या मुलांची यादी किंवा तिची एक प्रत चावडीवर किंवा अन्य प्रमूख स्थळी लावावी. शिक्षणास योग्य वयाच्या मुलांची यादी प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत मुलांच्या आई-बापानी आपापली मुले शाळेत पाठवावीत अशा यादीविरुध्द कोणास अपील करावयाचे असल्यास त्याने ३० दिवसाचे आत ते करावे .शाळेत येण्याच्या ठरविलेल्या तारखेपासून ७ दिवसाचे आत जर ती मुले शाळेत न येथील तर अशा शाळेच्या मास्तरने अशा मुलांची नांवे व त्यांच्या पालकांची नांवे मामलेदार यास कळवावीत. मामलेदाराने अशा मुलाचे बालकास समन्स काढावे आणि त्याचे म्हणणे ऐकून घेऊन ते संयुक्तीक न दिसल्यास प्रत्येक मुलाबद्दल १ रु.दंड करावा हा दंड प्रत्येक महिन्यास मुले शाळेत येईपर्यन्त करावा.[७]

त्याच प्रकरणामध्ये दलीतोध्दारासंबंधीचे कानूकायदे देतात, ते पुढे म्हणतात अस्पृश्यांना व स्पृश्यांना शाळाखात्यात निरनिराळ्या तऱ्हेने वागविले जाते व अस्पृश्यांना शाळा खात्याच्या इमारतीच्या कंपाऊंडच्या आंत येऊ दिले जात नाही .सरकारी इमारती खासगी उपयोगाकरिता दिल्या नसल्यामुळे

अस्पृश्यांना तुच्छतेने वागविण्याचा कोणालाही हक्क नसून अस्पृश्यांची प्रत्येक त-हेने काळजी घेतली पाहिजे. शिक्षण संस्था गरीब लोकाकरिता असून गरीबांतील गरीब जे अस्पृश्य त्यांना समतेच्या पायावर वागविणे योग्य आहे. ते कर देतात तर मग त्यांना वाईट रितीने का वागवावे ? जर अस्पृश्यांना समतेने वागविले नाही तर मग तो प्रिन्सिपाल अगर खालच्या दर्जाचा शिक्षक असो त्याला जाब द्यावा लागेल आणि खासगी संस्थाना जी मदत मिळते ती काढून घेण्यात येईल.[8]

दुसरी आज्ञा काढली की कोल्हापूर इलाख्यातील रेव्हिन्यू,ज्युडिशिअल आदि करुन सर्व अधिका-यांनी आमच्या संस्थानात जे अस्पृश्य नोकरी धरतील त्यांना प्रेमाने व समतेने वागविले पाहिजे, जर कोणा अधिका-याची वरीलप्रमाणे अस्पृश्यांना वागविण्याची इच्छा नसेल त्याने हा हुकूम पोचल्यापासून सहा आठवड्याच्या आत नोटीस देऊन राजीनामा द्यावा.[9] त्याला पेन्शन मिळणार नाही. आमची अशी इच्छा आहे की,राज्यातील कोणाही इसमाला जनावराप्रमाणे न वागविता मनुष्याप्रमाणे वागवावे.

अशा प्रकारचे कायदे झाल्यामुळे बहिष्कृत समाजाच्या प्रगतीच्या वाटा खुल्या झाल्या.

`महाराज व सामाजिक चळवळ` या आठव्या प्रकरणामध्ये शाहू महाराजांनी सामाजिक समता प्रस्थापणेसाठी व धर्माची विसकटलेली घडी नीट बसविण्याकरिता कोल्हापूरात सामाजिक चळवळीचा पाया घातला. राजर्षि शाहू महाराजांनी सदनशीर मार्गाने व लोकोपयोगी कार्य करणा-या चळवळीला मनोभावे मदत केलेली आहे.२८ ऑगस्ट १९२२ इ.रोजी सत्यशोधक समाजाने दिलेल्या मानपत्रास महाराजांनी जे उत्तर दिले ते सामाजिक चळवळीला परिपोषक आहे.[10] त्यापासून अखिल प्रजाजनांना आपले चुकते कुठे हे समजून येणार आहे.याचसाठी या खाली महाराजांच्या भाषणाचा आशय थोडक्यात दिला आहे.`अज्ञानांधकारात चाचपटत पडलेल्या दीनजनांच्या उध्दारासाठी आणि त्यांना स्वार्थी ,ढोंगी व

लबाड लोकांच्या उपद्रवापासून मुक्त करण्याकरिता आपल्या या राष्ट्रात जितक्या संस्था निघतील तितक्या त्या देशाच्या हिताच्याच ठरतील. या संस्थामुळेच खरे कोणते व खोटे कोणते यातील अंतर समजणार आहे. व त्यामुळे त्याची गुलामगिरीही नष्ट होणार आहे. देशबांधवांच्या उन्नतीचे पवित्र कार्य बजावणाऱ्या ज्या काही थोड्या संस्था निघालेल्या आहेत त्यापैकीच आपली ही एक कार्यक्षम संस्था असून तिने झालेल्या प्रचंड विरोधाला न जुमानता आपले लोक सुधारणेचे कार्य झपाटयाने बजावलेले आहे हे सांगण्यास मला भूषणास्पद वाटते. साप्रतच्या वेळी करावयाची चळवळ निधड्या छातीने केली पाहिजे. आणि ती करीत असता आपल्यातील विनय व चिकाटी मोठ्या सावधगिरीने सांभाळली पाहिजे.[११]

' बादशहाकडून महाराजांचा बहुमान ' या १० व्या प्रकरणामध्ये सम्राट बादशाहा पंचम जॉर्ज यांनी संतुष्ट होऊन छत्रपती श्री राजाराम महाराजांच्या प्रगमनशील राज्यकारभाराचे द्योतक चिन्ह त्यांना जी.सी.आय.ई.हा बहुमानाचा मोठा किताब अर्पण केला. ३ जून १९२४ रोजी जी.सी.आय.ई.ही पदवी महाराजांना मिळाली.यावेळी श्री.हुजूर स्वारीचेवर मानपत्रांचा वर्षाव झाला. सर्व जाती,धर्म व पंथ यांनी छत्रपति सरश्रीराजाराम महाराज यांचेवरील आपली स्वामीनिष्ठा मानपत्राद्वारे व्यक्त केलेली आहे.तारीख १४ जून १९२४ इ.रोजी कोल्हापूर नगरपालिकेने महाराजांना मानपत्र देऊन त्यांचा गौरव केला.[१२]

या मानपत्राला महाराजांनी उत्तरादाखल जे भाषण केले ते असे -
' साम्राज्य सरकारकडून आम्हास ' जी.सी.आय.ई. ' हा जो बहुमानाचा किताब अगदी थोड्या अवधीत देण्यात आला हे आमचे सद्भाग्य होय. राज्यारोहण होऊन फक्त दोन वर्षे झालेली आहेत. आणि या अवधीत आमच्या हातून या बहुमानाच्या योग्यतेचे कर्तव्य झालेले नाही याची आम्हाला जाणीव आहे.तरी पण सार्वभौम बादशहाकडून राज्यकारभाराच्या कामी,उत्तेजन यावे म्हणून आम्हाला ही बहुमानाची पदवी दिली असावी असे आम्हाला वाटते.नेक नामदार सर लेस्ली विलसनसाहेब बहादूर व आमचे सन्माननीय रेसिडेंट कर्नल पॉटिंजरसाहेब यांच्या प्रेमळ सहानुभूतीबदल आम्ही त्यांचे आभारी आहोत.[१३] त्याच्याही पुढे

जाऊन राजाराम महाराज म्हणतात` आम्हास साम्राज्य सरकारकडून जी.सी. आय.ई.ही बहुमानाची मोठी पदवी मिळाली म्हणून आपण माझा जो सत्कार करीत आहात त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. वडीलाला जशी सर्व मुले सारखी असतात तशी राजाला सर्व प्रजा सारखी आहे. हिंदु लोकांतील संस्कृति अशी आहे की,संतति व रयत या दोन्हीही शब्दांचा अंतर्भाव प्रजा ह्या एकाच शब्दात असल्याचे मानण्यात येते. ह्यावरुन पहाता हेच दिसून येते की,स्वजातीच्याच नव्हे पण अगदी भिन्न जातीच्या धर्माच्याव पंथाच्यासुध्दा प्रजेवर राजाने सारखेच प्रेम करणे हेच त्यांचे परमपवित्र व आद्य कर्तव्य आहे.असेच मी ही मानतो.आणि याच पवित्र तत्वाचा पुरस्कार करुन मी माझ्या राज्यव्यवस्थेत उच्चप्रतीच्या नोकरीत सुध्दा सर्व धर्माच्या,जातीच्या व पंथाच्या योग्य लोकांना प्रवेश दिला आहे. इतकेच नव्हे तर समता व न्यायदान ही सारी,शक्य तितकी तंतोतंत पाळली जावीत या उदात हेतूने प्रेरित होऊनच,लोकसंख्येच्या प्रमाणात लायक माणसांना आम्ही संधि दिलेली आहे.`[१४]

दिवसेंदिवस अशारितीने ,महाराजांचा गुणगौरव होत गेला आणि सुखसमृध्दी व आयुरारोग्य लाभावे म्हणून सर्वत्र सारखी शुभ चिंतने होऊ लागले.

` राजकीय प्रगति व प्रजेची स्थिति` या १३व्या प्रकरणामध्ये छत्रपति राजाराम महाराजांनी राजकीय व सामाजिक सुधारणेसाठी अधिक प्रयत्न केले त्याविषयी माहिती दिलेली आहे.

लेफ्टनंट कर्नल ही बहुमानाची नवी पदवी सन १९२७ मध्ये साम्राज्य सरकारकडून महाराजांना देण्यात आली.यामुळे करवीरच्या सर्व प्रजाजनाना मोठा आनंद झाला. सरकारच्या गुणाग्राही व प्रगतीप्रिय धोरणाबद्दल व महाराज स्वारींच्या कर्तृत्व निष्ठेबद्दल आनंद व्यक्त करणारे ठराव पास करण्यात आले.[१५]

श्री राजाराम महाराजांनी नगर सुधारणा घडवून आणण्यासाठी जे प्रयत्न केले ते बहुमोल आहेत.शहर सुधारणेसाठी शहर सुधाराई खाते दरबारने निर्माण केले हे खाते रावब.प्राईम मिनिस्टर यांचे देखरेखीखाली असून ते प्रत्यक्ष

ही सर्व व्यवस्था पहात असत. लोकल फंड सेस अॅमेंडमेन्ट ( कोल्हापूर अॅक्ट ऑफ १९२७ ) १ जानेवारी १९२७ पासून संस्थानास लागू करण्याची योजना जाहीर झाली.[१६]

ज्या पुलामुळे लक्ष्मीपूरी व शाहुपूरी जोडली गेली तो लेडी विल्सन पूल १३ एप्रिल १९२७ रोजी नेकनामदार साहेबबहादूरांच्या हस्ते खुला करणेत आला हा पूल ७०,००० रुपये किंमतीचा असून त्यावरुन सुरु झालेल्या रहदारीमुळे त्याला सुंदर स्वरुप प्राप्त झालेले आहे.

कोल्हापूर अॅग्रीकल्चरिस्ट रिलिफ अॅक्ट - हा २६ जून १९२७ रोजी जाहीर झाला.[१७] याचा शेतकऱ्यांना चांगला उपयोग झाला हा १९२७ चा कोल्हापूर अॅक्ट म्हणून संबोधला जातो.

विविध माहिती या १६ व्या प्रकरणामध्ये छत्रपति राजाराम महाराजांनी अंगिकारलेली इतर कामे व त्याची दृश्य स्वरुपे आणि त्या बाबतची काही इतर माहिती थोडक्यात दिलेली आहे.

दि रेसिडेन्सी कोल्हापूर ही इमारत १८४५ ते १८४८ मध्ये बांधली गेली. पुढे वारंवार त्यात नवी सुधारणा झालेली आहे हे ठिकाण हवेशीर व रमणीय आहे. कंपाऊंडच्या आत सुंदरसा छोटा तलाव असून समोवार झाडी असल्यामुळे या स्थळाला शोभा आलेली आहे. त्याच बरोबर नवीन राजवाडा ही भव्य इमारत सन १८७७ ते १८८४ सालात बांधली गेली.[१८] बांधकामाचा खर्च ७ लाख रुपये झाला. राजवाड्याच्या घड्याळाचा टॉवर १५ फूट रूंद व १३५ फूट उंच आहे. राजवाड्याच्या आतील दरबार हॉलचे काम अत्यंत सुंदर झालेले आहे.

कोल्हापूर स्टेट रेल्वेचा ३१ मार्च १९३२ पर्यन्त खर्च वगैरे वजा जाता एक सालचा नफा २,२८,७७८ दरबारला मिळाला. दरसालचे प्राप्तीचे प्रमाण कमीजास्त असते. त्याच बरोबर कोल्हापूर हे फिल्म कंपन्याबद्दल हिंदुस्थानात पहिल्या प्रतिचे स्थान बनले आहे.[१९] महाराजांचे कडून या कंपन्याना जरुर ते साहित्य पुरवून उत्तेजन दिले जाते सध्या कोल्हापूर सिनेटोन व शालिनी सिनेटोन हा

कंपन्या चांगल्या प्रसिध्दीस आलेल्या आहेत. याशिवाय इतर कंपन्या सरकारी आश्रयाने आपापल्यापरीने काम करीत आहेत.

त्याच्याही पुढे जाऊन त्यानी लिहिले आहे की बहिष्कृत लोक महार, मांग व कधी कधी चांभार यांची कामगिरी बऱ्याच मोठया प्रमाणावर झालेली आहे. महार लोकांनी पाटीलकीची कामे केली आहेत.न्यायदानाच्या पंचायतीमध्ये महारांनी दिलेले निकाल महत्वाचे आहेत.किल्ल्यांच्या संरक्षणाची बहुतेक जबाबदारी या वर्गावरच असल्याचे दिसून येते.[२०]

' लोकसंख्या व राजकीय स्थिति ' या चौथ्या प्रकरणामध्ये लोकसंख्येच्या मोजदादीची माहिती दिलेली आहे. इंग्रज लोक हिंदुस्थानात आले त्यावेळी त्यांनी राष्ट्रीय परिस्थितीचे परिक्षण केले या परिक्षणात त्यांना हिंदुस्थानात भिन्नवंशीय लोक असल्याचे दिसून आले.मात्र त्यांची लोकसंख्या कोणकोणत्या प्रमाणात आहे याच्या अंधुक कल्पनेशिवाय ठोकळ अनुमान ठरविण्याला त्यांना दुसरा मार्ग या वेळी उपलब्ध नव्हता कारण यापूर्वीच्या कोणत्याही अमदानीमध्ये जातवार व वंशावार लोकसंख्येची मोजदाद करणेचा कोणत्याही पध्दतशीर प्रयत्न झालेला नव्हता पण ब्रिटिशांनी पध्दतशीर लोकसंख्या ठरविण्यासाठी खानेसुमारीचा नवा मार्ग या देशात सुरु केला. इ.स.१९०३ साली प्रसिध्द करण्यात आली.[२१] लोकसंख्येची शास्त्रीय प्रमाणे खालील तक्यावरुन नेमकी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

ब्रम्हदेशाशिवाय हिंदुस्थानातील प्रांतानिहाय हिंदूची एकूण संख्या

(सन १९०१ च्या खानेसुमशिवरुन )

| | प्रांत | अस्पृश्य | एकूण हिंदु |
|---|---|---|---|
| १ | पंजाब,काश्मीर,राजपुताना | ३६,३८,७४५ | १,९७,३१,५९२ |
| २ | मुंबई,मद्रास,कुर्ग | ३४,३९,०८४ | १,६७,३४,९५२ |
| ३ | मद्रास,म्हैसूर,हैद्राबाद,त्रावणकोर | १,५३,७४,०७३ | ५,२६,२६,३६६ |
| ४ | छोटा नागपूर | ३९,३७,७९९ | ६४,००,३६० |

| | प्रांत | अस्पृश्य | एकूण हिंदु |
|---|---|---|---|
| ५ | मध्यप्रांत व व-हाड | २३,४५,२१० | १,३३,३२,३९८ |
| ६ | संयुक्त प्रांत | १,००,४८,८५८ | ४,०६,४९,३९१ |
| ७ | बिहार | ४१,१६,०८३ | १,८९,८८,७०३ |
| ८ | बंगाल | ७९,५८,७२१ | १,७७,२१,०८० |
| ९ | ओरिसा | ११,०६,७९३ | ३७,६६,५२७ |
| १० | आसाम,सिक्किम | १२,३१,२६६ | २७,६८,३६९ |
| | एकूण | ५,३१,९६,६३२ | १९,२७,१९,७३८ |

याप्रमाणे प्रांतवार स्पृश्य व अस्पृश्य वर्गाची संख्या आहे.यात हिंदुची जी एकूण संख्या दाखविली आहे त्यात अस्पृश्यांची संख्या गणलेली आहे.[२२]

अखिल अस्पृश्यांची प्रांतवार संख्या

( या संख्येत संस्थाने व ब्रह्मदेश धरला आहे )

| | प्रांताचे नाव | अस्पृश्यांची एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | अजमेर,मेरवाड | ९२,६१८ |
| २ | आसाम (ब्रम्हपुत्रा खोरे ) | ४,८०,९६० |
| ३ | आसाम (सुरमा खोरे ) | ५,२९,१६४ |
| ४ | बंगाल | १, ०९,२२७२२ |
| ५ | ओरिसा | ५,७४,७८८ |
| ६ | बिहार | २३,७५,०७८ |
| ७ | व-हाड | ४,६८,०२० |
| ८ | मुंबई | २१,८९,१८५ |
| ९ | ब्रह्मदेश | ६२,३७३ |

| | प्रांताचे नाव | अस्पृश्यांची एकूण संख्या |
|---|---|---|
| १० | मध्यप्रांत | २३,२४,३६१ |
| ११ | कुर्ग | ५०,०५८ |
| १२ | मद्रास | ९३,४९,६३२ |
| १३ | संयुक्त प्रांत | १,००,४८,११७ |
| १४ | पंजाब | ३३,८२,८१४ |
| १५ | बडोदे | १,६३,१७६ |
| १६ | मध्य हिंदुस्थानातील संस्थाने | २२,३२,५१६ |
| १७ | ग्वाल्हेर | ५,१३,१२७ |
| १८ | कोचीन | ८१,६५१ |
| १९ | निजाम हैद्राबाद | २५,९८,३६४ |
| २० | काश्मिर | १,६३,३१३ |
| २१ | राजपुताना | १३,३२,९०० |
| २२ | म्हैसूर | ११,०३,८५१ |
| २३ | त्रावणकोर | ६,९८,२७७ |
| | एकूण | ५,१७,३८,६७३ |

लोक संख्येच्या बाबतीत योग्य ती कल्पना येण्यासाठी एवढी माहिती पुरेशी आहे.[२३]

या काळातच एक चित्तवेधक गोष्ट घडलेली आहे. `रायगड` हा अभेद्य किल्ला इंग्रजांना सर करता येईना, पुष्कळ प्रयत्न करुन सुध्दा यश येणेचे काही चिन्ह दिसेना पण पुढे इंग्रजांच्या सुदैवाने पाचगडच्या रायनाक महाराने तो किल्ला कसा सर करावा या बदल गुरुमंत्र इंग्रजांना दिला आणि त्याने सांगितल्या रोखानेच किल्ल्यावर तोफा डागल्या. तोफा अर्थातच इच्छित स्थळी जाऊन भिडल्या. किल्ल्यातील दारुगोळाचे भांडार पेटले गेले आणि हातचे मोठे युध्द

साहित्य नाहीसे होऊन मराठे हतबल झाले.किल्ला इंग्रजांनी सर केला.[२४]

` दलित समाजाचा राजकीय दर्जा` या १६ व्या प्रकरणामध्ये नव्या सुधारणेच्या काळात अस्पृश्य समाजाला आपला राजकीय दर्जा इतरांच्या बरोबरीने मिळविणेची महत्वाकांक्षा निर्माण झालेली आहे. या विषयी माहिती दिलेली आहे. याच्या पुढे असे लिहिले आहे की धर्मकारण व समाजकारण जाणता येऊ लागले की,मग राजकारण हाती घ्यावे असे सुधारक लोक नेहमी म्हणतात.अस्पृश्य समाज हा धार्मिक व सामाजिक बाबीत इतरांच्या बरोबरीने काम करतो मग त्याने इतराप्रमाणेच आपल्या संरक्षणासाठी राजकीय हक्क मागितले तर सनातन्यांना का वाईट वाटावे ? सन १९३२ डिसेंबरातील तिसरी गोलमेज परिषद झाल्यानंतर सरकारनी सन १९३३ साली मार्च महिन्यात हिंदुस्थानास द्यावयाच्या राजकीय सुधारणांचा खलीता जाहीर केला याला` शुभ्र पत्रिका` असे ही म्हणतात नव्या सुधारणेमुळे हिंदी राष्ट्रात अस्पृश्यतेच्या प्रश्नाला अधिक महत्व प्राप्त झालेले आहे.[२५] सरकारच्या समतोल दृष्टीमुळे दलित वर्गाची सुधारणा होऊ लागली.

इंग्रजी सत्ता व दलित जनता` हे पुस्तक लिहिल्यानंतर श्री.दा.म.शिर्के यानी ७-९-१९३६ मध्ये` करवीर सरकारचे दलितोध्दाराचे कानू` हे पुस्तक लिहिले. करवीर राज्यात अस्पृश्यता निवारणाचे प्रयत्न केव्हा कसे सुरु झाले याची थोडीशी माहिती या पुस्तकाच्या सुरुवातीला दिली असून पुढे क्रमाक्रमाने जे कानू कायदे जाहिर झाले त्यासंबंधी जरुर ती हकीगत योग्य त्या स्थळी देण्यात आलेली आहे.[२६]

न्यायमूर्ती रावबहादुर चव्हाण व्ही.जी.यानी या पुस्तकास अभिप्राय व्यक्त केला आहे की ते म्हणतात सामाजिक चळवळीने अस्पृश्यता निवारण्याचे बाबतीत विशेष प्रगती होत नाही असे आढळून आल्यावर राजर्षि शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा सदुपयोग करुन त्यासंबंधी कायदे केले ते सर्व कायदे एकत्रित करुन त्या त्या वेळचे प्रसंग उल्लेखून ग्रंथरुपाने प्रसिध्द करण्याचे कार्य दा.म. शिर्के यांनी केले असून त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. ते कायदे एकत्रित

केल्याने राजर्षिंनी अस्पृश्यता निवारण्याच्या बाबतीत किती प्रयत्न केले व त्यात त्याची अंत:करणाची तळमळ कशी हे दिसून येते. अस्पृश्यता निवारण्याचे काम पुढे छत्रपति राजाराम महाराज यांनी चालू ठेवून त्या कार्याची पुर्तता करण्याचे प्रयत्न केले.[२७]

अस्पृश्यता निवारणाचे प्रयत्न यामध्ये वतनी बलूत्याचा फायदा या विषयी माहिती दिली आहे.हिंदु समाजाची दोषपूर्ण वर्ण व्यवस्था ढासळून दिल्याशिवाय हिंदुसमाजाचा उध्दार होणार नसून अस्पृश्यता नाहीशी होणार नाही अशी महाराजांची दृढ समजूत असल्यामुळे त्यांनी जन्मावर स्थापित केलेल्या वर्णभेदावर प्रतिकाराचे शस्त्र उपसले. याकामी केलेल्या सनातनी लोकांकडून महाराजांना अतिशय त्रास झाला. परंतु त्यानी झालेल्या त्रासाची अगर अपमानाची पर्वा न करता अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी काही कायदे जाहिर करण्यास सुरुवात केली.सन १९१८ साली बलुत्याचा कायदे जाहीर केला.त्याप्रमाणेच अस्पृश्य मानलेल्या लोकांची हजरी घेण्याची पध्दत बंद करण्यात आली. शिकून तयार होऊ लागलेल्या लोकांना ज्याच्या त्याच्या पात्रतेप्रमाणे सरकारी खात्यात नोकऱ्या मिळू लागल्या.[२८]

जाती वाचक शाळा बंदीची आज्ञा राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांनी सन १९१९ साली समतेच्या शिक्षणाचा हुकूम जाहिर केला होता.याच्याविषयी माहिती देण्यात आली आहे.त्याच्या पुढे असे म्हटले की सर्वच खेड्यात शाळेसाठी स्वतंत्र इमारती नसतात काही शाळा मारुतीच्या देवळातही भरतात.तेंव्हा अशा शाळेच्या एकत्रित व्यवस्थेमुळे ,अस्पृश्य मानिलेल्या समाजाचे विद्यार्थी देवळातील शाळेतही इतर विद्यार्थ्यांप्रमाणे येऊ लागले पण असे होणे काही मंडळींना रुचले नाही त्यांनी या विरुध्द पुष्कळ तक्रार करुन पाहिली परंतु त्यात त्यांना मुळीच यश येऊ शकले नाही. या परिस्थितीला उद्देशून राजर्षि श्री शाहू महाराज म्हणातात सर्व फ्री शाळांतून सुर्यवंशी,लोकांना घेणेचा हुकूम देण्यात आला आहे. मारुतीच्या देवळात शाळा असल्यासही घेणेचा आहे. देवास का विटाळ माणसाचा होतो ? देवाची वा आज्ञा आहे की,अमक्याचा विटाळ मानावा व अमक्याचा विटाळ मानू नये म्हणून ? मुळीच नाही.[२९] अशा प्रकारे महाराजांनी

अस्पृश्य मानिलेल्या विद्यार्थ्यांची सोय इतर विद्यार्थ्यांना मिळत असलेल्या सोयी-प्रमाणेच ठेवणेबद्दल आज्ञा केल्यामुळे विद्यालयातील अस्पृश्यता पुढे आपोआपच कमी होऊ लागली.

विषमता प्रतिबंधक कानू नावाचा कायदा छत्रपती शाहू महाराजांनी सन १९१९ मध्ये केला, त्याच्यामध्ये अशी माहिती दिली आहे की, कोल्हापूर इलाख्यातील रेव्हिन्यू, ज्युडिशियल, आदिवरुन सर्व अधिकाऱ्यांनी आमच्या संस्थानात जे अस्पृश्य नोकरी धरतील त्यांना प्रेमाने व समतेने वागविले पाहिजे. जर कोणा अधिकाऱ्यांची वरीलप्रमाणे अस्पृश्यांना वागविण्याची इच्छा नसेल त्यांने हा हुकूम पोहोचल्यापासून सहा आठवड्याच्या आत नोटीस देऊन राजीनामा द्यावा त्याला पेन्शन मिळणार नाही. आमची अशी इच्छा आहे की, आमच्या राज्यातील कोणत्याही इसमाला जनावराप्रमाणे न वागविता मनुष्य प्राण्याप्रमाणे वागवावे.[३०]

छत्रपती राजर्षि शाहू महाराजांनी ' सार्वजनिक स्थळाबद्दल जाहिरनामा' असा काढला की सर्व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, रेस्ट हाफसीस, सरकारी अन्नछत्रे वगैरे ठिकाणी व नदीचे पाणूते, सार्वजनिक विहिरी येथे कोणत्याही मनुष्य प्राण्याचा विटाळ मानण्याचा नाही. ख्रिश्चन पब्लिक विल्डिंगमध्ये सार्वजनिक विहिरीवर जसे अमेरिकन मिशनमध्ये डॉ. व्हेल व वॅालेस हे सर्वांना समतेने वागवितात त्याप्रमाणेच येथेही कोणाचाही विटाळ न मानता वागविण्याचे आहे. तसे न झाल्यास गांवकामगार, पाटील, तलाठी यांना जोखीमदार धरले जाईल. सदरचा हुकूम ग्याझीट करावा[३१] असा आदेश राजर्षि शाहू महाराजांनी दिला.

हा जाहीरनामा जाहीर झाला त्यावेळी संस्थानच्या अस्पृश्य समाजाची प्रगती बरीचशी सुधारणेच्या मार्गाला लागली होती. आणि ती सुधारण्यास सरकारी सक्तीच्या काही ठरावांचे पाठबळही लाभले होते. तरीपण वाढत्या प्रगतीसाठी सदरचा जाहिरनामा प्रसिध्द करणे जरुरीचे आहे अशी महाराजांची खात्री पटल्यानंतर त्यांनी तो जाहीर केला. आणि सार्वजनिक स्थळा-वरील अस्पृश्यता नाहीशी केली. परंतु सार्वजनिक देवळातील भेदाभेद मात्र तसेच

राहिले. तरीपण जुन्या राजवाड्यातील कुलस्वामीनी श्री अंबाबाई देवी व शककर्ते छत्रपति श्रीशिवाजी महाराजांपासून ते चौथ्या शिवाजी महाराजांचे पर्यन्त त्यांचे दर शुक्रवारी जे छबिने निघतात, त्यातील हत्तीवरील महात महारच असल्यामुळे श्री देवीच्या व छत्रपतींच्या पूर्वजांच्या पवित्र पादूकांना स्पर्श - करण्यास त्यांना पूर्ण मोकळीक ठेवण्यात आलेली होती असे स्पष्ट दिसून येते. त्याप्रमाणे सोनतळी कँम्पातील मरगाईच्या आगहातील देवदेवी, सर्व पीर व गजेन्द्रलक्ष्मी या सर्वास कोणताही भेदभाव न मानता कँम्पातील सर्व लोक जातात असे महाराजांनी एका प्रसंगी जाहिर केलेले आहे. अशा प्रकारे मंदिर प्रवेशाच्या बाबतीत महाराजांनी त्यावेळेच्या परिस्थितीमध्ये सुरु केलेले उपक्रम समतेचा पुरस्कार करणारे असून ते आज सर्वांनाच मार्गदर्शक झालेले आहेत यात शंका नाही[३२] पुढे हेच कार्य छत्रपति राजाराम महाराजांनी सुरु केले.

राजर्षि शाहू महाराजांनी १५ जुलै १९२१ रोजी वेठवरळा प्रतिबंधक कायदा केला. ज्या महार लोकांनी आपली वतने रयताव्यात दाखल करावीत म्हणून अर्ज केला असेल त्यांच्याकडून अर्जाच्या तारखेपासून नोकरी घेणेची नाही. त्यांचा वेठवरळा माफ करणेत यावा. तराळ घस्त लोकांना वेठवरळा सांगणेचे नाही. जर कोणी आपले मनगटाचे जोरावर सदर लोकांना वेठवरळा करणेस लावतील तर त्यांना नोकरीतून पेन्शन न देता कमी केले जाईल व वतनदार असलेस त्यास वतनांतूनही कमी केले जाईल याची दखलगिरी प्रत्येक गांवकामगारास द्यावी या प्रमाणे जरुर तजवीज करावी[३३] अशा पध्दतीचा कायदा केला.

दलितोध्दाराचे निरनिराळे कानू जाहीर करुन त्या समाजाच्या प्रगतीचा मार्ग कसा निष्कंटक करता येईल याचा विचार करीत असता सोमवंशी वर्गाच्या उन्नतीस 'महारकी वतन' विघातक झाले असल्याचे महाराजांना दिसून आले. वतनाच्या गोंडस नावाखाली या समाजाचे जिवित भयंकर कष्टप्रद झाले असून वेठीच्या पध्दतीमुळे त्यात दु:खाची वाढती आहुती पडून अनर्थ कसे गुदरलेले आहेत यासंबंधी एका जाहीर सभेत भाषण करताना महाराज म्हणतात ' आजारी पडलेल्या मुलांच्या अंथरुणावरुन ओढून काढून त्यांच्या माता-पित्यांना

वेठीला लावलेले आणि काम संपवून परत येण्याच्या अगोदरच ती आजारी मुले मरुन गेल्याचे, त्या दुर्दैवी माता-पित्यांच्या नशिबी आलेले अशी उदाहरणे मी पाहिलेली आहेत यापेक्षा अधिक जुलमी जुलूम काय असणार.[३४]

राजर्षिंच्या या उद्गारावरुन अस्पृश्य समाजांच्या परिस्थितीबद्दल त्याच अंत:करणास कशी तळमळ लागून राहिलेली होती याची कोणालाही स्पष्ट कल्पना येते म्हणूनच त्यांनी ' महारकी वतनें' रयतावा करुन सोमवंशी समाजाला वंशपरंपरेच्या गुलामगिरीतून मुक्त केले अशा त-हेने आपल्या राज्यातील वेठवरळ्याचा जुलमी प्रकार महाराजांनी सदरचा कायदा जाहीर करुन तो दूर केला.

या कायद्यान्वये व्यवस्था ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक गांवच्या गांवकामगारावर आहे .गांव कामगारांचे वर्तन इतर स्पृश्य रयतांशी जसे असते तसेच ते सोमवंशी लोकांशीही असले पाहिजे.[३५]

अशारितीने दा.म.शिर्के यांची ग्रंथ रचना थोडी असली तरी त्यातील त्याचे विचार व आशय पुढील पिढीस मार्गदर्शक ठरणार आहेत याबद्दल काही दुमत नाही. पुस्तकरुपापेक्षा त्याचे लिखाण अनेक वर्तमानपत्रातून, पाक्षिकातून, नियतकालिकातून विपूल प्रमाणात आहे ते एक प्रतित यश लेखक होवून गेले.

## संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १ | शिर्के दा.म.कोल्हापूरचा राज्यकारभार | |
| २ | कित्ता -,,- | पॉ.नं. |
| ३ | कित्ता | पा.नं.३ |
| ४ | कित्ता | पा.नं.२४ |
| ५ | कित्ता | पा.नं.२८ |
| ६ | ,, | पा.नं.३८ |
| ७ | ,, | पा.नं.३९,४० |
| ८ | ,, | पा.नं.४१ |
| ९ | ,, | पा.नं.४२ |
| १० | ,, | पा.नं.६० |
| ११ | ,, | पा.नं.६१ |
| १२ | ,, | पा.नं.७९ |
| १३ | ,, | पा.नं.८० |
| १४ | ,, | पा.नं.८१,८२ |
| १५ | ,, | पा.नं.१२८ |
| १६ | ,, | पा.नं.१२९ |
| १७ | ,, | पा.नं.१३० |
| १८ | ,, | पा.नं.१६२ |
| १९ | ,, | पा.नं.१६५ |
| २० | ,, | पा.नं.२५ |
| २१ | ,, | पा.नं.३० |
| २२ | ,, | पा.नं.३२ |
| २३ | ,, | पा.नं.३० |
| २४ | शिर्के दा.म.इंग्रजी सत्ता व दलित जनता, पा.नं.४१ | |
| २५ | कित्ता | पा.नं.१७१ |

२६ शिर्के दा.म.- करवीर सरकारचे दलितोध्दाराचे कानू,पा.नं.३
२७ कित्ता पा.नं.७
२८ कित्ता पा.नं.११
२९ कित्ता पा.नं.२२
३० कित्ता पा.नं.२५
३१ कित्ता पा.नं.२७
३२ कित्ता पा.नं.२८
३३ कित्ता पा.नं.३२
३४ कित्ता पा.नं.३३
३५ कित्ता पा.नं.३३